# सहशिक्षण – मुलांसाठीची शिक्षण प्रक्रिया आकर्षक करण्याकरता

ही गोष्ट खांडेपाडामधल्या जिल्हा परिषद शाळेची आहे. नंदुरबार विभागात असलेली ही एक दुर्गम शाळा. शाळेमध्ये २ शिक्षक असून एकूण ३१ विद्यार्थी आहेत. साध्यासुध्या परंतु अत्यंत उपयुक्त पायाभूत सुविधा असलेली ही शाळा विद्यार्थ्यांचे सहशिक्षण, समुदायाचा सहभाग आणि त्यातून साध्य होणारा त्यांचा क्षमता विकास याचे उत्कृष्ट उदाहरण ठरली आहे.

ग्यानप्रकाश फाउंडेशन २०१६पासून नंदुरबार विभागात काम करत आहे. जिल्ह्यातील शिक्षण व्यवस्थेतील विविध प्रक्रिया वेळेवर, गुणवत्तापूर्ण पद्धतीने होण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील घटकांना सक्षम करण्याचे काम ग्यानप्रकाश करत असते. याच प्रक्रियेचा एक भाग असलेल्या केंद्र संसाधन समितीमध्ये खांडेपाडाच्या शाळेतले एक शिक्षक सदस्य म्हणून काम करत होते. तसेच इतर शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी मदत करण्याचेही काम ते करत होते.

फेब्रुवारी २०२३मध्ये ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी या शाळेला भेट दिली. त्यावेळेस शाळेतील मुले गटांमध्ये शिक्षण घेत असून आपल्याबरोबर शिकणाऱ्या मुलांसाठी विविध उपक्रम घेण्याचे कामदेखील मुलेच करत असल्याचे दिसले. त्यासाठी प्रत्येक गटातून एक किंवा दोन मुले पुढाकार घेऊन इतर मुलांना विविध विषय किंवा संकल्पना समजून घेण्यासाठी मदत करताना दिसली.

शाळेमध्ये एकूण चार गट होते. ते इयत्तेनुसार केलेले असावेत असे आम्हाला सुरुवातीला वाटले. परंतु ते प्रत्येक मुलाच्या अध्ययन पातळीनुसार केले असल्याचे शिक्षकांनी आम्हाला सांगितले. त्यामुळे एका गटात वेगवेगळ्या इयत्तांमधली मुले होती.



मुलांना काही अडले किंवा शैक्षणिक साधनांची आवश्यकता भासली तरच शिक्षक मदत करत होते. एरवी मुले एकमेकांच्या मदतीने शिकत होती. प्रत्येक गटातून एक मूल गटचर्चा घेण्यात पुढाकार घेत होते. तसेच बाकीच्यांना लागेल तशी मदत करत होते. कधीकधी या मुलांच्या पालकांनाही आम्ही उपक्रम घेण्यासाठी बोलावतो असे शिक्षकांनी आम्हाला सांगितले. अनेक पालक मुलांना अभ्यास दौऱ्यांवर घेऊन जातात. तसेच शाळा संपल्यावर संध्याकाळचे अभ्यास गटदेखील पालकांनी तयार केले आहेत आणि पालकच हे गट घेतात. पालकांना त्यासाठी तयार करण्याचे काम शिक्षकांनी केलेले आहे. त्यासाठी पालकांसोबत कसे काम करावे आणि त्यांना कसे तयार करावे याचे शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचे काम ग्यानप्रकाश फाउंडेशनने केले. नियमित होणाऱ्या शिक्षण परिषदेतून शिक्षकांची अशी क्षमता बांधणी होत असते.

वर्गात विविध आकर्षक उपक्रम घेत असल्याने तसेच हे उपक्रम घेण्याची पद्धतही मुलांना त्यात रुचि वाटेल अशी असल्याने शाळेमध्ये मुलांची नियमित उपस्थिती असते. मुलांना शाळेत तसेच पालकांबरोबर आणि आजूबाजूच्या समाजातूनदेखील वैविध्यपूर्ण शिक्षणानुभव मिळत आहेत. यातून शाश्वत शिक्षण प्रक्रियेचे ध्येय साध्य होताना दिसत आहे.

शाळेने सहशिक्षणाच्या दिशेने इतकी लक्षणीय प्रगती करण्यामागे केंद्र संसाधन समितीच्या बैठका आणि शिक्षण परिषदेचा खूप मोठा हात आहे असे या शिक्षकांनी सांगितले. या बैठकांमधून आपल्याला वर्गामध्ये तसेच पालकांना बरोबर घेऊन विविध प्रयोग करण्यासाठी प्रेरणा मिळाली असेही त्यांनी नमूद केले.





दिनांक: मे २०२३
©: ग्यान प्रकाश फाउंडेशन
2016 पासून एडेलगिव्ह फाऊंडेशनद्वारे अर्थसहाय्यित, महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या कोलॅबोरेटर्स फॉर ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन (CTE) प्रोग्राममध्ये शिकलेल्या गोष्टींवर आधारित आहे.